# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ५६/२०२३ दिनांक :- १७/०२/२०२३

## अग्नीशस्त्र विक्री करण्यासाठी आलेल्या इसमास एक गावठी पिस्तुल, ७ जिवंत काडतुसे एक लोखंडी सुरा व मोटार सायकलसह अटक.

## वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

----०००----

दिनांक १५.२.२०२३ रोजी वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.हवा. ०६११८ सचिन दोरकर यांना सांयकाळी दोन इसम हे मोटार सायकलवरुन अग्निशस्त्र खरेदी-व्रिकीकरिता गोलानी नाका, वसई पुर्व येथे येणार असल्याची गोपनीय माहिती त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत मिळाल्याने, मिळालेल्या गोपनीय माहीतीची शहानिशा करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्यासाठी वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा.पो.निरीक्षक श्री. ज्ञानेश फडतरे यांना सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी गोलाणी नाका, वसई पुर्व येथे सापळा रचून आरोपीत नामे १) धर्मेंद्र शिवबदन यादव व २) हिरानाथ ऊर्फ मामा बनारस यादव यांना एक गावठी पिस्तुल, ०७ काडतुसे, एक लोखंडी सुरा तसेच ॲक्टीवा मोटार सायकल अशा एकुण ९१,५००/- रु. किंमतीच्या मुददेमालासह ताब्यात घेतले. नमूद आरोपीतांनी विनापरवाना स्वतःच्या कब्जात अग्नीशस्त्र, काडतुसे, धारदार सुरा बाळगल्याने त्यांच्याविरुध्द वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नंबर I २००/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३, ४, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चा अधिनियम कलम ३७(१) (३), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून नमूद गुन्हयात त्यांना दिनांक १५/०२/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास वालीव पोलीस ठाणेचे सहा.पो.निरीक्षक ज्ञानेश फडतरे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार तथा अतिरिक्त कार्यभार परिमंडळ २, वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग तथा अतिरिक्त कार्यभार तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. मिलींद साबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि.ज्ञानेश फडतरे, पो.ह.मनोज मोरे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, गजानन गरिबे यांनी केलेली आहे.

----००००----